# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** राजुरा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0360 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 24/03/2026 02:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिंनाक पासून):** 23/03/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 23/03/2026
**Time From (वेळेपासून):** 07:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 23:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 23/03/2026 **Time (वेळ):** 23:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 24/03/2026 02:17 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 22 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सिमा तपासणी नाका , लक्कडकोट ,राजुरा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): पोलीस उप अधीक्षक अनिल मोहनरेड्डी जिट्टावार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,नागपु,नागपुर ,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,नागपु,नागपुर ,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9823270581

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पाहीजे आरोपी खाजगी एंजन्ट श्री.विलास देशमुख | | | 1. बाबुल खेडा नागपुर ,नागपुर , नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | पाहीजे आरोपी मोटर वाहन निरीक्षक पवन प्रभाकर पोटदुखे | | | 1. प्रादेशिक परिवहन कार्यालय, चंदपुर ,चंद्रपु ,राजुरा ,चंद्रपुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | एक समसंग कंपनीचा निळसर रंगाचा स्मार्टफोन ज्याचा IMEI NO 352456/88/289865/1, 354076/81/289865/0 असा | 0.00 |
| 2 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | हजेरी पुस्तक | एक लाल रंगाचे कव्हर असलेले रजिस्टर ज्यावर काळ्या अक्षरात हजेरी पट 01102025 ज्यावर असे लिहीले असुन | 0.00 |
| 3 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, कार्यालय चंद्रपूर यांचा आदेश क्र. 35/आस्था/प्रापका/चंद्रपूर 2026 दि. | 0.00 |
| 4 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | दि. 23 मार्च 2026 रोजी 9/43 मिनीटानी श्री. पवन पोटदुखे मो. वा.नि. प्रादेषिक परिवहन अधिकारी कार्यालय च | 0.00 |
| 5 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | कष बुक रेकर्ड मधील दि. 21/03/2026 ते दि. 23/03/2026 पावेतोच्या नोंदी असलेल्या पानांच्या झेरक्स प् | 0.00 |
| 6 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1) आरोपी खाजगी इसम याने तक्रारदार याचेकडुन स्विकारलेली लाच रक्कम 500/ रुपयाची चलनी नोट जिचा NS 6355 | 500.00 |
| 7 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2) घटनास्थळावरुन एकुण 7120/ रुपये | 7,120.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

7,620.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिंयाद पो.स्टे. राजुरा,जि. चंद्रपुर
दिंनाक 23/03/2026

माझे नाव अनिल मोहनरेड्डी जिट्टावार, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस उप अधीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिंबधक विभाग,नागपुर, मोनं 9823270581

समक्ष पोलीस स्टेषन पो.स्टे. राजुरा, जि.चंद्रपुर येथे हजर होउन तक्रार लिहुन देतो की, मी मागील दिड वर्षापासुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग नागपुर येथे कार्यरत आहे.

आम्ही दि.20/03/2026 रोजी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग कार्यालय झिरो माईल चौक, नागपूर येथे हजर असतांना श्री. दिंगबर प्रधान, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांनी आम्हाला त्यांचे कक्षात बोलावले असता आम्ही प्रत्यक्ष त्यांचे कार्यालय लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, प्रशासकिय इमारत क्र. 01, सिव्हील लाईन नागपूर येथे त्यांचे कक्षात गेलो. त्यांचे कक्षात एक व्यक्ती बसुन होते. मा. पोलीस अधीक्षक सरांचे कक्षात हजर असलेल्या व्यक्तीस पोलीस अधीक्षक सरांनी आमचा परिचय करून दिला व त्या व्यक्तीचा परिचय आम्हास मोहम्मद कयुब अब्दुल सत्तार वय -47 वर्ष व्यवसाय- वाहन चालक रा- मनेहु◌ॅ◌ं थाना- जेठवारा पोस्ट - सराए भिमसेन तहसिल- पट्टी जि. प्रतापगढ (उत्तरप्रदेश) असा करून दिला. मोहम्मद कयुब अब्दुल सत्तार यांची लोकसेवक तसेच खाजगी इसमाविरूध्द लाचेच्या मागणी संबंधाने तक्रार आहे. त्यांना तुमचे कक्षामध्ये घेवून जावून योग्य ती कायदेषीर कार्यवाही करा असे मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांनी आदेषित केले. त्यानुसार आम्ही तक्रारदार मोहम्मद कयुब अब्दुल सत्तार यांना आमचे कार्यालय लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, मॅनेजर बंगला, झिरोमाईल नागपूर,येथे घेवून आलो. तक्रारदार मोहम्मद कयुब अब्दुल सत्तार वय -47 वर्ष,व्यवसाय- वाहन चालक रा- मनेहु◌ॅ◌ं थाना- जेठवारा पोस्ट - सराए भिमसेन तहसिल- पट्टी जि. प्रतापगढ(उत्तरप्रदेश), हे वेळ अंदाजे 15.00 वा. चे सुमारास मॅनेजर बंगला, झिरोमाईल नागपूर कार्यालयात हजर आले असुन त्यांनी आम्हास लोकसेवक तसेच खाजगी इसमाविरूध्द तक्रार असल्याचे सांगितले. त्यावरून आम्ही त्यांची हस्तलिखीत तक्रार सादर केली. सदर तक्रारीवर आम्ही समक्ष म्हणून सही केली.

त्यानंतर लाचरक्कम मागणीची पडताळणी व सापळा कार्यवाहीसाठी 2 शासकीय पंचाची आवष्यकता असल्याने आम्ही मा. शिक्षण उपसंचालक कार्यालय नागपूर विभाग नागपूर यांना पत्र देऊन वर्ग-3 चे दोन शासकीय कर्मचारी पंच म्हणून काम करण्यास उपलब्ध करुन देण्याबाबतचे पत्र पोषी. प्रफुल भातुलकर यांचे हस्ते सादर केले. त्यानुसार त्यांचे कार्यालयातील वर्ग-3 चे श्री. षुभम धनराज काटकर, वय-34, पद- कनिष्ठ लिपीक, शिक्षण उपसंचालक कार्यालय नागपूर विभाग नागपूर रा. सक्करदरा,तिंरगा चौक, नागपूर व श्री. आकाष अषोकराव रेवतकर, वय-34, पद- कनिष्ठ लिपीक, षिक्षण उपसंचालक कार्यालय नागपूर विभाग नागपूर रा. नंदनवन,नागपूर यांना आमचे कार्यालयात पोषी. प्रफुल भातुलकर यांचेसह पाठविले. वर नमूद कर्मचारी त्यांच्या कार्यालयातून आमचे कार्यालयात वेळ 16:45 वा. पोशि. प्रफुल भातुलकर यांचे सह हजर आले. पोशि. प्रफुल भातुलकर यांनी त्यांची ओळख आम्हास करुन दिली. .त्यानंतर आम्ही दोन्ही पंचाना आमची ओळख करून देवुन त्यांना सांगितले की, आमचेकडे लोकसेवक व खाजगी इसमाविरुध्द लाचेच्या मागणीसंबंधी तक्रार आली असून, सदर तक्रारीची लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करावयाची आहे. पडताळणी दरम्यान गैरअर्जदारकडून लाचेची मागणी झाल्यास त्याअनुरुप लोकसेवकांविरुध्द सापळयाचे आयोजन करुन पुढील कार्यवाही करावयाची आहे. अषा कारवाईत त्यांनी पंच म्हणून काम करण्याबाबत संमती घेतली असता त्यांनी संमती दिली. त्यानंतर आम्ही पंचाना तक्रारदार यांनी सांगितल्याप्रमाणे टंकलिखित केलेली तक्रार दाखविली असता ती, खालीलप्रमाणे,

मेरा नाम:- मोहम्मद कयुब अब्दुल सत्तार उम्र-47 साल व्यवसाय- वाहन रहना- मनेहु◌ॅ◌ं थाना- जेठवारा चालक पोस्ट - सराए भिमसेन तहसिल- पट्टी जि. प्रतापगढ (उत्तरप्रदेष) मो.क्र. 8737944920

मै अँन्टी करप्शन ब्युरो नागपूर कार्यालयमे आकर रिपोर्ट देतो हु कि, मै उपर दिये पतेपर परिवारके साथ रहता हु । और निंमल तेलंगाना के अदनान फैसल इनके ट्रक क्र. टी.एस./36/टी/1116 (चौदा चक्का) पे पिछले छह माह से ड्रायव्हर का काम करता हु और हमारा ट्रक तेलंगाना से छत्तीसगड, महाराष्ट्र मध्यप्रदेश, मध्यप्रदेश यहा ट्रान्सपोर्ट द्वारा माल भेजा और लाया जाता है ।

आज से अंदाजन 15 दिन पहले ट्रक क्र. टी.एस./36/टी/1116 (चौदा चक्का) ये मै खुद चलाते हुवे वाहनमे चना भरकर आसिफाबाद से साकोली के लिए चंद्रपुर-जाम-नागपूर होते हुवे जा रहा था । लक्कडकोट बॉर्डर चेकपोस्टपर मैने गाडीका वजन किया गाडीका वजन मालके साथ 25,500 किलो था । चेकपोस्टपर 200/- की वजन पावती लेकर ट्रक थोडा आगे लेकर गया तो आरटीओ चेकपोस्ट लक्कडकोट के आर.टी.ओ. अधिकारी द्वारा वहा खडा रखा खाजगी एजेंट ने मेरा ट्रक रोका वहा मेरा ट्रक अंडरलोड रहने के बावजुद आरटीओ चेकपोस्ट पर खडे आर.टी.ओ. अधिकारी के खाजगी एजेंट ने मुझसे चालान न काटने के बदले एंट्री के नाम पर 1500/- रुपये रिष्वत की मांग की

थी तब मैने उसे मेरा ट्रक अंडरलोड है और मेरे पेपर भी बराबर है तो किस बात के पैसे मांग रहे हो ऐसा पुछा तब उस खाजगी एजेंट ने मुझसे बोला की, मुझे इस चेकपोस्ट से जो भी गाडी जाती है उस गाडी का यहा के आर.टी.ओ. इंन्स्पेक्टर को एंट्री देनी पडती है नही तो आर.टी.ओ. इंन्स्पेक्टर चालान करते है । तब मैने उस आर.टी.ओ. अधिकारी ने रखे खाजगी एजेंट को चालान के डर से मजबुरीमे 700/- रुपये देकर ट्रक लक्कडकोट आरटीओ चेकपोस्टसे आगे लेकर गया और साकोली मे माल खाली किया । लक्कडकोट आरटीओ चेकपोस्टसे ट्रक पास करने आर.टी. ओ. अधिकारी द्वारा रखा एजेंट ट्रक ड्रायव्हर से हमेशा 1000/- से 1500/- रुपये लेता है । मेरे जानकारी के अनुसार आर.टी.ओ. चेकपोस्ट पर जो कोई भी आर.टी.ओ. इंन्सपेक्टर बोलके काम करते है ओ अपने खाजगी एजेंट के माध्यम से हर गाडी से आर.टी.ओ. चेकपोस्ट पार करने के लिए ऍट्री की मांग करते है इस काम के लिए आर.टी.ओ. इंन्स्पेक्टर ने वहा आर.टी.ओ. चेकपोस्ट पे खाजगी एजेंट रखा हुवा है । किसी भी गाडी के फिटनेस मालकी, बिल्टी इत्यादी चेक करने के कारण बताकर हर गाडीयो से 1000/- या 1500/- रुपये की रिश्वत मांगकर तत्काल स्विकारते है ।

तारीख 23/03/2026 को मेरे ट्रक क्र. टी.एस./36/टी/1116 (चौदा चक्का) मे चना माल भैसा तेलंगाना से भरके नागपूर लेके जाना है । आरटीओ चेकपोस्ट लक्कडकोट के आरटीओ और खाजगी लोग मुझे ट्रक चेकपोस्ट से आगे छोडनेके लिये पिछली बार 700/- रुपये लिए थे । इस बार भी वे मेरा ट्रक चेक पोस्ट से पास करणे के लिए पैसे जरुर मांगेगे । परंतु मेरी आर.टी.ओ. चेकपोस्ट पे पैसे देने की बिलकुल इच्छा नही है, इसलिये मैने ट्रक चेकपोस्ट के पहलेही कुछ दुरीपर रोककर आज तारीख 20/03/2026 को तक्रार देने के लिये अँन्टी करप्शन, ब्युरो नागपूर यहा आया हु । तक्रार के साथ मै मेरा ड्रायव्हींग लायसन्स, गाडीके कागज और 1500/- रुपये जमा कर रहा हु।

मेरी आरटीओ चेकपोस्ट लक्कडकोट के आर.टी.ओ. अधिकारी या उन्होने रखे किसी व्यक्ती के साथ झगडा या विवाद नही है और नाही किसी से ही पैसे कि लेन देन है ।

यही मेरी आर.टी.ओ. चेकपोस्ट लक्कडकोट ड्युटीपर तैनात अधिकारी और उन्होने चेकपोस्ट पर रखा खाजगी एजेंट विरुध्द तक्रार है मेरे बताए मुताबीक लॅपटॉप पर टाईप पढकर सुनाया मेरे बताए मुताबीक सही है ।

अशी तक्रार पंचानी वाचुन टंकलिखित तक्रारीबाबत तक्रारदार यांचेशी तोंडी विचारपुस करून ती बरोबर असल्याची खात्री केल्यावर त्यावर दोन्ही पंचानी स्वाक्ष-या केल्या व त्यानंतर सदरची तक्रार आम्ही संगणकावर टंकलीखीत करून त्यावर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचानी स्वाक्ष-या केल्या. तक्रारदार यास लिहीता वाचता येत नसल्याने तक्रारदार याची तोंडी रिपोर्ट टंक लिखित करण्यात आली.

त्यानंतर तक्रारदार मोहम्मद कयुब अब्दुल सत्तार यांना गैरअर्जदार यांना लाचे मध्ये देण्याकरिता आणलेले पैसे हजर करण्यास सांगितले असता त्यांनी लाच रक्कम 500/- रू दराच्या 02 नोटा,200/- रू.दराची 01 नोट व 100/- रू.दराची 03 नोटा असे एकुण 1500/- रू.अशी आपल्या वैयक्तिक बचतीतील हजर केली तसेच त्यांनी आधार कार्ड व चालक परवाना यांच्या झेरॉक्स प्रती आमचेकडे हजर केली आम्ही व दोन्ही पंचांनी सदर कागदपत्रांची पाहणी करून तक्रारदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतींवर स्वाक्षऱ्या केल्यात, दोन्ही पंचांनी पंच म्हणुन सदर कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या केल्यात आम्ही समक्ष म्हणुन सदर कागदपत्रांवर सादर स्वाक्षऱ्या केल्या.मोहम्मद कयुब अब्दुल सत्तार यांनी हजर केलेल्या 500/- रू दराच्या 02 नोटा,200/- रू.दराची 01 नोट व 100/- रू. दराची 03 नोटांचे क्रमांक पंच क्रं. 1 यांनी वाचले पंच क्र.2 यांनी पडताळुन पाहिल्या. 500 रुपये दराच्या चलनी नोटांचे क्रमांक 2 NS 635510, 2 EA 572967, तसेच 200 रुपये दराच्या चलनी नोटांचे क्रमांक 2 ND 544687 100 रुपये दराच्या चलनी नोटांचे क्रमांक 2 EF 668827, 8 WK 647394,2EM 692521 असे आहेत.

यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना लाचेच्या सापळा प्रकरणात उपयोग करण्यात येणाऱ्या अँथ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहीती देवून अँथ्रासिन पावडरचा संपर्क आलेल्या भागावर अल्ट्राव्हॅ◌ायलेट दिव्याचे प्रकाशात पाहिल्यास पावडरला हिरवट रंगाची चकाकी दिसुन येते असे सांगीतले. त्यानंतर आम्ही कार्यालयात हजर असलेले पो.षि. विकेष राऊत यांना या बाबत प्रात्यक्षीक करून दाखविण्यास सांगीतले. पो.षि. विकेष राऊत यांनी आलमारीतुन अल्ट्राव्हॅ◌ायलेट दिवा, काळ्या रंगाचे कापड व सिंलबद लिफाफा काढून पंचांना दाखविला. त्यानंतर तो लिफाफा फोडुन त्यातुन एक काचेची बॉटल काढली व त्यात हिरव्या रंगाची पावडर होती. सदरची पावडर ही ''अ◌ॅन्थ्रासिन पावडर असल्याबाबत आम्ही तक्रारदार व पंचांना सांगितले. अँथ्रासिन पावडरच्या बाटलीचे◌े झाकण उघडुन त्यातील थोडी अँन्थ्रासिन पावडर पो.षि. विकेष राऊत यांनी स्वतःच्या उजव्या हाताच्या एका बोटास लावुन सदर बोट पो.षि. विकेष राऊत यांनी उजव्या हाताच्या इतर बोटास चोळुन त्यांनी उजव्या हाताची बोटे दाखविली

असता बोटांना पावडर लागल्याचे दिसुन येत नव्हते. यानंतर आम्ही कार्यालयाचे कक्षात प्रकाशाची तीव्रता कमी करण्यासाठी दारे खिडक्या, लाईट बंद केले. नंतर काळ्या कापडयाच्या मदतीने अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाषात पो.षि. विकेष राऊत यांनी त्याच्या उजव्या हाताची बोटे तपासले असता बोटांचे ज्या भागाला अँथ्रासिन पावडर लागले होते त्या भागावर हिरवळसर रंगाची चकाकी दिसून आली.त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचाना सांगीतले की, हिच अँन्थ्रासिन पावडर लाचेमध्ये द्यावयाच्या नोटांना दोन्ही बाजुंनी लावण्यात येते. हया पावडर लावलेल्या नोटा जो कोणी हाताळेल त्यांच्या हाताच्या बोटांना नोटांवरील पावडर चिकटते. नोटा हाताळणाऱ्या इसमाचे हाताचा तसेच शरीराचा किंवा कपडयाचा जो भाग अँन्थ्रासिन पावडरच्या संपर्कात येईल त्यास अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाषात हिरवट रंगाची चकाकी प्राप्त होईल. तसेच हया नोंटा ज्या-ज्या ठिकाणी ठेवल्या जातील त्या त्या ठिकाणी सुध्दा नोटांवरिल पावडर चिकटते. त्या ठिकाणी हिरवळसर रंगाची चकाकी दिसुन येईल.त्यांनतर आम्ही कार्यालयाचे कक्षात प्रकाष करण्यासाठी दारे खिडक्या उघडुन, लाईट सुरू केले. त्यानंतर आमचे सुचने वरुन पो.षि. विकेष राऊत यांनी टेबलवर एक कोरा कागद ठेवुन त्यावर वर नमुद केलेल्या 500/- रू दराच्या 02 नोटा,200/- रू.दराची 01 नोट व 100/- रू.दराची 03 नोटा असे एकुण 1500/- रू. ठेवुन त्यास हाताच्या सहाय्याने दोन्ही बाजुने अँन्थ्रासिन पावडर लावली व त्या नोटा झटकुन दाखविल्या असता नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावल्याचे दिसत नव्हते.यानंतर आम्ही कार्यालयाचे कक्षात प्रकाशाची तीव्रता कमी करण्यासाठी दारे खिडक्या, लाईट बंद केले. नंतर काळया कापडयाच्या मदतीने अल्ट्रा अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाषात पो.षि. विकेष राऊत यांनी त्याच्या उजव्या हाताची बोटे तपासले असता बोटांचे ज्या भागाला अँथ्रासिन पावडर लागले होते त्या भागावर हिरवळसर रंगाची चकाकी दिसून आली.त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचाना सांगीतले की, हिच अँन्थ्रासिन पावडर लाचेमध्ये द्यावयाच्या नोटांना दोन्ही बाजुंनी लावण्यात येते. हया पावडर लावलेल्या नोटा जो कोणी हाताळेल त्यांच्या हाताच्या बोटांना नोटांवरील पावडर चिकटते. नोटा हाताळणाऱ्या इसमाचे हाताचा तसेच शरीराचा किंवा कपडयाचा जो भाग अँन्थ्रासिन पावडरच्या संपर्कात येईल त्यास अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाषात हिरवट रंगाची चकाकी प्राप्त होईल. तसेच हया नोंटा ज्या-ज्या ठिकाणी ठेवल्या जातील त्या त्या ठिकाणी सुध्दा नोटांवरिल पावडर चिकटते. त्या ठिकाणी हिरवळसर रंगाची चकाकी दिसुन येईल.त्यांनतर आम्ही कार्यालयाचे कक्षात प्रकाष करण्यासाठी दारे खिडक्या उघडुन, लाईट सुरू केले. त्यानंतर आमचे सुचने वरुन पो.षि. विकेष राऊत यांनी टेबलवर एक कोरा कागद ठेवुन त्यावर वर नमुद केलेल्या 500/- रू दराच्या 02 नोटा,200/- रू.दराची 01 नोट व 100/- रू.दराची 03 नोटा असे एकुण 1500/- रू. ठेवुन त्यास हाताच्या सहाय्याने दोन्ही बाजुने अँन्थ्रासिन पावडर लावली व त्या नोटा झटकुन दाखविल्या असता नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावल्याचे दिसत नव्हते.यानंतर आम्ही कार्यालयाचे कक्षात प्रकाशाची तीव्रता कमी करण्यासाठी दारे खिडक्या, लाईट बंद केले. नंतर काळया कापडयाच्या मदतीने अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पो.षि. विकेश राऊत यांनी नोटा तपासल्या असता नोटांच्या ज्या भागाला अँथ्रासिन पावडर लागले होते त्या भागावर हिरवळसर रंगाची चकाकी दिसून आली. पो.शि. विकेश राऊत यांनी अँन्थ्रासिन पावडर लावलेल्या एकुण 1500/- रूपयाचे बंडल तयार करून सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवकामोटर वाहन निरीक्षकस देण्याकरीता एका लिफाप्यात ठेवल्या. तो लिफापा ट्रॅप बॅगेत लोखंडी आलमारीत सुरक्षित ठेवण्यात आला. पो.शि. विकेष राऊत यांना त्यांचे हात साबणाने स्वच्छ धुण्यास सांगितले. त्यानंतर त्यांचे हात आणि कपडे अंधार करुन अल्ट्राव्हायलेट लॅपच्या प्रकाशात तपासले असता त्यांच्या हातावर आणि कपडयांवर कोणतीही चकाकी दिसून आली नाही. त्यानंतर पो.शि. विकेश राऊत यांना सापळा पार्टीतुन वगळण्यात आले.

त्यानंतर आम्ही, तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पार्टीतील सदस्यांना आमचेकडील कार्यालयात उपलब्ध असलेल्या डिजीटल व्हॉईस रेकार्डर बाबत माहिती दिली. याच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरचा तक्रारदार मोहम्मद कयुब अब्दुल सत्तार व गै.अ.यांच्यात सापळा पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान होणारे संभाषण रेकॉर्ड करण्याकरिता उपयोग करण्यात येणार आहे. सदर उपकरण रेकॉर्डींग मोडवर सुरू केल्यास रेकॉर्ड झालेल्या संभाषणाची व्हॉईस फाईल ऑटोमॅटीकपणे तयार होते व जर हे उपकरण बंद झाले तर रेकॉर्डींग सुध्दा बंद होते आणि व्हॉईस फाईल सुद्धा बंद होते.उपकरण पुन्हा रेकॉर्डींग मोडवर सुरू केले असता नविन व्हॉईस रेकॉर्डींग फाईल तयार होते व पुर्वीची रेकॉर्ड फाईल खराब होत नाही किंवा त्यावर पुर्नलिखान किंवा पुर्नमुद्रीत होत नाही. सदर डिजीटल वॉईस रेकॉर्डर हे ''सोनी'' कंपनीच्या बनावटीचे आय.सी.डी.-पी.एक्स 470 या मॉडेलचे असून त्यात 04 GBइंटरनल मेमरी आहे. त्यानंतर त्यांना डिजीटल वॉईस रेकॉर्डरमध्ये टाकण्यात येणाऱ्या मेमरी कार्ड बद्दल माहीती देण्यात आली. आमचे सुचनेवरून पोशि प्रफुल भातुलकर यांनी एका नविन पॅकेट मधून मायक्रो एस.डी. कार्ड बाहेर काढून दाखविले त्यावर Sandisk 32 GB micro SDHC card serial no 4237 ZVL 103 AY BM असे छापील नाव असलेले मेमरी कार्ड तक्रारदार व पंचाना दाखविले. ते मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डर चे स्लॉटमध्ये टाकले. नंतर पोशि

प्रफुल भातुलकर यांनी व्हॉइस रेकॉर्डर स्वीच ऑन करून दाखविला असता मायक्रो एस.डी.कार्ड व इंटरनल मेमोरी मध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हॉइस रेकॉर्डींग ची फाईल रेकॉर्ड नसल्याबाबत दोन्ही पंचाना खात्री करून दिली. त्यांनतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना सांगितले की, सापळा पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान डिजीटल व्हॉइस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड होणारे संभाषण हे मेमोरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत होईल त्यानंतर ते मेमोरी कार्ड ताब्यात घेवून एका लिफाफ्यात ठेवून आमचे व पंचाचे सहीने सिलबद करण्यात येईल. त्यानंतर ते कार्यालयीन संगणकासोबत जोडून मायक्रो एस.डी.कार्ड व इंटरनल मेमोरी मध्ये सुध्दा व्हॉइस रेकॉर्डींग फाईल नसल्याचे दाखवून दिले.

दिंनाक 23/03/2026 रोजी तक्रारदार मोहम्मद कयुब अब्दुल सत्तार व दोन्ही शासकीय पंच हे दिंनाक 20/03/2026 रोजी केलेल्या प्रात्यक्षिक पंचनामा कार्यवाही दरम्यान दिलेल्या सुचनेप्रमाणे दोन्ही पंच सकाळी 06.00 वा हजर आले व तक्रारदार हे आपले गाडी मालकासह 07/00 वा चे दरम्यान लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, कार्यालय झिरो माईल नागपूर येथे हजर आले. गोपणियतेच्या दृष्टीने ठरविण्यात आलेल्या दोन खाजगी चारचाकी इनोव्हा वाहन क्र. एम.एच. 49 बी.झेड 5875 व एम.एच. 49 बी. झेड. 1827 असा ठरविण्यात आल्या होत्या. दोन्ही वाहने वाहन चालकांनी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, कार्यालय झिरो माईल नागपूर येथे सकाळी 07/15 वा घेवुन आले. आज रोजी सापळा पडताळणी कार्यवाही करीता लक्कडकोट आर.टी.ओ चेक पोस्ट जिल्हा चंद्रपूर येथे जाण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तसेच तक्रारदार यांनी सांगीतले की, त्यांचे मालकाचा ट्रक क्रमांक टी.एस./36/टी/1116 (चौदा चक्का) हा लोड होवुन चंद्रपूर आसिफाबाद हायवे रोडवरील वाकडी गावाजवळ उभा असुन सदरचा ट्रक लक्कडकोड चेकपोस्ट मार्गे नागपुर जाणेकरीता चेकपोस्ट पार करणे आहे. त्यानुसार आम्ही, वर नमुद दोन्ही पंच, सापळा पथकातील सदस्य- पोनि. जितेद्र वैरागडे, पोहवा विलीन तांबडे, पो.अं. होमेश्वर वाईलकर, प्रफुल भातुलकर, म.पो.अं. स्वाती हिंडोरीया असे सापळा पथक तयार करून अंदाजे 07.30 वा. लक्कडकोट आर. टी.ओ चेक पोस्ट जिल्हा चंद्रपूर येथे जाण्याकरीता सापळा कार्यवाहीचे सर्व साहित्य- ट्रॅपबॅग, लाचरक्कम ठेवून असलेल खाकी लिफापा (ज्यात रू. 500/- दराच्या एकुण 2 चलनी नोटा, 200/- दराची 1 चलनी नोट, 100/- रुपये दराच्या 3 चलनी नोटा असे एकुण 1500/-रूपये), काळा कापड, लॅपटॉप व प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट लाईट, व्हॉईस रेकॉर्डर, नवीन मेमोरी कार्ड, सिलींग लेबलींगचे साहित्यासह तपास पथक खाजगी चारचाकी इनोव्हा वाहन क्र. एम.एच. 49 बी.झेड 5875 मध्ये आम्ही दोन शासकिय पंच, तक्रारदार, पो.नि. वैरागडे व पोलीस अंमलदार होमेश्वर वाईलकर असे व पथक खाजगी चारचाकी इनोव्हा वाहन क्र.एम.एच. 49 बी. झेड. 1827 मध्ये पो.हवा. विलीन तांबडे पो.अं. प्रफुल भातुलकर व म.पो.अं. स्वाती हिंडोरीया आम्ही सर्व कार्यालयातून रवाना झालो.

त्यानंतर आम्ही सर्व चंद्रपूर, बल्लारशहा, राजुरा, लक्कडकोट असे जावुन वाकडी फाटयावर वेळ 11/10 थांबलो. तिथे तक्रारदार हे सापळा पथकाचे गाडीवरुन उतरुन ट्रक ताब्यात घेतले तेव्हा त्यांना तिथुन आसिफाबाद चंद्रपूर हायवेवरील हॉटेल नागराज समोर हायवेवर पोहचण्या करीता सांगुन आम्ही रवाना झालो व त्यांनतर आम्ही तसेच तक्रारदार हे आपले ट्रक सह आसिफाबाद चंद्रपूर हायवेवरील हॉटेल नागराज समोर हायवेवर येथे अंदाजे 11.40 वा. पोहचलो. वर नमुद दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांना सापळा पडताळणी कार्यवाही व सापळा कार्यवाहीबाबत माहिती देवून गैरअर्जदार यांची लाच रक्कम मागणीची पडताळणी व सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. प्रत्यक्ष पडताळणी कार्यवाही व सापळा कार्यवाहीच्या अनुशंघाने पंचनाम्यात नमुद केल्याप्रमाणे सविस्तर सुचना देण्यात आल्या.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच क्र. 2 यांचे हस्ते तक्रारदार यांचे पँटचे उजव्या खिशात प्रात्यक्षिक पंचनामा मध्ये नमुद नोटा एकुण 1500/- रुपये ठेवण्यात आले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पो.शि. भातुलकर यांनी मेमोरीकार्ड क्र. Sandisk 32 GB micro SDHC card serial no 4237 ZVL 103 AY BM टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून पंच क्र. 1 यांच्या आवाजात तक्रारदार मोहम्मद कयुब अब्दुल सत्तार यांचेसोबत गैरअर्जदार यांचेकडे लाच रकमेच्या पडताळणी व सापळा कार्यवाहीकरीता पाठविण्याकरीता वेळ 12.00 वा व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून पंच व तक्रारदार यांचे नाव व दिंनाकासह पंच क्र. 1 यांचे आवाजात संभाशण ध्वनीमुद्रीत करून होल्ड मोड वर करण्यात आले. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदार यांच्या गळयात कपडयाच्या आत सहज दिसुन येणार नाही या पध्दतीने अडकवण्यात आला. त्यानंतर तक्रारदार, सापळा पथकातील सदस्य पो.नि. वैरागडे व पो.अं. होमेष्वर वाईलकर असे तक्रारदार यांचे वाहन ट्रक क्र. टी.एस./36/टी/1116 (चौदा चक्का) ने व ट्रक क्र. टी.एस./13/यु. सि./2695 ने पंच क्र. 1 व 2, आम्ही असे आर.टी.ओ. चेकपोस्ट लक्कडकोट येथे जाण्याकरीता एका मागे एक असे नमुद ट्रक असे वेळ 12.05 वा रवाना झालो. चारचाकी इनोव्हा वाहन क्र. एम.एच. 49 बी.झेड 5875 वाहनाने पार्टीतील सदस्य पो.हवा. विलीन तांबडे, पो.अं. प्रफुल भातुलकर व म.पो.अं. स्वाती हिंडोरीया हे आर.टी.ओ.

चेकपोस्ट चे हजर राहुन आमचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्याकरीता कोणालाही संशय येणार नाही असे हजर होते. तक्रारदार यांचे वाहन ट्रक क्र. टी.एस./36/टी/1116 (चौदा चक्का) व ट्रक क्र. टी.एस./13/यु.सि./2695 या वाहनाचे एका मागोमाग काटा पावती करुन वेळ 12/10 वाजता दरम्यान आर.टी. ओ. चेकपोस्ट लक्कडकोट समोर नमुद दोन्ही वाहने उभी झालीत. तक्रारदार व पंच क्र. 1 नमुद दोन्ही वाहनातुन खाली उतरुन दोघेही एकसोबत आर.टी. ओ. चेकपोस्ट लक्कडकोट येथील कार्यालयाचे एजेंट असलेल्या खिडकीजवळ गेले. तेथे हजर खाजगी एजेंट यांचेसोबत बोलणी केली तेव्हा आम्हा सापळा पथक पार्टी क्र. 1 व 2 यांना तक्रारदार व पंच क्र. 1 यांच्या हालचाली स्पश्ट दिसत होत्या व आमचा पंच क्र. 1 यांचेशी कॉल सुरु होता. त्यामुळे त्यांचे गैरअर्जदार यांचेसोबत होणारे संभाशण आम्हाला ऐकु येत होते. वेळ 12/11 वा. सुमारास तक्रारदार यांनी लाच मागणी स्विकारणी करीता आपला उजवा हात डोक्याचे वरून गोल फिरवून नेमुन दिलेला नियोजित ईशारा दिला. आम्ही सापळा पार्टी क्र. 1 व 2 लगेच गैरअर्जदार खाजगी इसम यांना ताब्यात घेण्याकरीता धावत निघालो परंतु गैरअर्जदार यांना सापळा कार्यवाहीबाबत समजल्याने तेथुन धाव घेवुन आर.टी.ओ. चेकपोस्ट लक्कडकोट कार्यालयाच्या मागच्या दाराने पळ घेवुन पळुन गेला. सापळा पार्टी क्र. 3 यांना तात्काळ बोलाविण्यात आले. त्यानंतर सापळा पार्टी क्र. 1, 2 व 3 यांचे मार्फतीने गैरअर्जदार आर.टी.ओ. अधिकारी व खाजगी ईसम यांचा षोध घेतला परंतु दोघेही मिळुन आले नाही. कार्यालयात फक्त तेथील श्री. दिनेष निंळकठ सिडाम, वय 44 वर्ष, पद- सहायक रोखपाल, कार्यालय - आर.टी.ओ. चंद्रपूर रा. काळाराम मंदिरामागे, समाधी वार्ड चंद्रपूर हे हजर होते.

त्यानंतर पोलीस अंमलदार यांना तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यास सांगीतले आम्ही दिलेल्या आदेशाप्रमाणे पो.अं. प्रफुल भातुलकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर पंच क्र. 1 यांचे व्हॉईस रेकॉर्डर मध्ये आवाज रेकॉर्ड करुन व्हॉईस रेकॉर्डर पंचांसमक्ष बंद करण्यात आले. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर पो.अं. प्रफुल भातुलकर यांचे हस्ते षासकिय लॅपटॉपला जोडुन तक्रारदार व गैरअर्जदार खाजगी इसम यांचे संभाशण मागे पुढे करुन आम्ही दोन्ही पंच व स्टाफसमक्ष ऐकले.

त्यानंतर पंच क्र. 1 यांना आर.टी.ओ चेक पोस्ट लक्कडकोट जि. चंद्रपूर येथे गेल्यावर काय घडले याबाबत तक्रारदार, सापळा पार्टीतील सदस्य व पंच क्र 2 यंाचे समक्ष विचारले असता, त्यंानी संागीतले की,'' तक्रारदार आणि मी गैरअर्जदार क्रमांक 1 यांचेकडे गेलो असता तेथील खाजगी एजेंट यांनी तक्रारदार यांना काटा परची बाबत विचारणा केली त्यावर तक्रारदार यांनी गैरअर्जदार क्र. 1 यांना काटापावती दिली त्यावर गैरअर्जदार क्र. 1 यांनी गाडीमध्ये काय आहे याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी चना असल्याचे सांगीतले. त्यावर गैरअर्जदार क्र. 1 यांनी पैशाची मागणी केली असता तक्रारदार यांनी किती असे विचारले त्यावर गैरअर्जदार क्र. 1 यांनी पाचशे रुपये असे सांगीतले त्यावर तक्रारदार यांना गैरअर्जदार यांनी लाच मागणी केल्याची खात्री झाल्यानंतर तक्रारदार यांनी आपल्या पॅंटच्या उजव्या खिषातील 1500 रुपयापैकी 500 रुपयाची एक नोट काढुन गैरअर्जदार क्र. 1 यांना दिली. गैरअर्जदार क्र. 1 यांनी ती नोट आपले उजवे हाताने घेवुन त्यांचेसमोर असलेल्या टेबलच्या ड्राव्हरमध्ये ठेवली. त्यानंतर माझे मोबाईलवरुन आपणास माहिती दिली व तक्रारदार यांनी नियोजित इशारा म्हणुन आपला उजवा हात डोक्याचे वरून गोल फिरविल्याने सापळा पथक तात्काळ घटनास्थळावर आले परंतु गैरअर्जदार क्र. 1 यांना सापळ्याबाबत अंदाजा आल्याने त्यांनी तेथुन पळ काढला. तसेच आम्ही तक्रारदार यंाना सुदधा विचारणा केली असता, त्यांनी पंच क्र. 1 यंानी सांगीतलेल्या घटनेला दुजोरा दिला.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचाच्या हस्ते तक्रारदार मोहम्मद कयुब अब्दुल सत्तार यांची सापळा पडताळणी नंतरची अंगझडती घेतली असता, त्यांची लाचेच्या मागणीची पडताळणी करिता जाण्यापुर्वीच्या अंगझडती यादी दरम्यान मिळून आलेल्या सर्व वस्तू बरोबर असल्याच्या आढळून आल्या. अंगझडतीची हस्तलिखीत यादी तयार करून आम्ही, दोन्ही पंच यांनी सहया केल्या. तसेच तक्रारदार यांनी त्यांचे वस्तु व रोख रक्कम परत मिळाल्याबाबत सही केली.

त्यानंतर सापळा पथकातील महिला अंमलदार स्वाती हिंडोरीया यांना आम्ही सुचना दिली की, सापळा पडताळणी व सापळा कार्यवाही मध्ये तक्रारदार तक्रारदार मोहम्मद कयुब अब्दुल सत्तार आणि गैरअर्जदार यांचे व्हाईस रेकॉर्डरव्दारे मुळ मेमोरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेल्या संभाषणाची लॅपटॉपवर शब्दषः स्क्रिप्ट तयार करावी. त्याप्रमाणे महिला अंमलदार स्वाती हिंडोरीया यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील मुळ मेमोरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले तक्रारदार व गैरअर्जदार क्र. 1 यांचे संभाषणाची शब्दषः स्क्रिप्ट कार्यालयीन संगणकावर तयार केली

यानंतर आम्ही पोलीस अंमलदार प्रफुल भातुलकर यांना सदर व्हाईस रेकॉडर मध्ये सापळा पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान रेकॉर्ड झालेल्या फाईलची सेव्हनझा हॅष व्हॅल्यु कॅलक्युलेटरच्या सहाय्याने हॅष व्हॅल्यु नमुद फाईलची हॅष व्हॅल्यु काढून, हॅष व्हॅल्यू प्रमाणपत्र देण्यास सांगितले. त्यानुसार त्यांनी सापळा पडताळणी कार्यवाही

दरम्यान रेकॉर्ड झालेली फाईल क्र. 260323-1200 ची सेव्हनझा हॅष व्हॅल्यु कॅलक्युलेटरच्या सहाय्याने हॅष व्हॅल्यु घेण्यात आली. त्यानंतर दिंनाक 23.03.2026 रोजी सापळा पडताळणी कार्यवाही व सापळा कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार खाजगी एजन्ट नामे विलास देशमुख व तक्रारदार श्री. मोहम्मद अब्दुल सत्तार यांचेमध्ये झालेले प्रत्यक्ष संभाषण रेकॉर्ड असलेले मेमोरीकार्ड क्र. Sandisk 32 GB micro SDHC card serial no 4237 ZVL 103 AY BM जप्त करण्यात आले.
त्यायनंतर श्री. दिनेश निंळकठ सिडाम, वय 44 वर्ष, पद- सहायक रोखपाल, कार्यालय - आर.टी.ओ. चंद्रपूर यांचेकडुन 1) आरोपी खाजगी इसम याने तक्रारदार याचेकडुन स्विकारलेली लाच रक्कम 500/- रुपयाची चलनी नोट जिचा NS 635510 असा आहे. 2) घटनास्थळावरुन एकुण 7120/- रुपये ,एक सॅमसंग कंपनीचा निळसर रंगाचा स्मार्टफोन ज्याचा IMEI NO 352456/88/289865/1, 354076/81/289865/0 असा असुन मोबाईलमध्ये जिओ कंपनीचे सिम ज्याचा क्रमांक 9579874322 असा आहे.3) एक लाल रंगाचे कव्हर असलेले रजिस्टर ज्यावर काळ्या अक्षरात हजेरी पट 01-10-2025 ज्यावर असे लिहीले असुन त्यात दैनंदिन ड्युटी ऑफीसर म्हणुन दि. 23/03/2026 रोजी शिफ्ट मध्ये श्री. पवन पोटदुखे यांची ड्युटी असल्याची नोंद व स्वाक्षरी आहे. 4) मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, कार्यालय चंद्रपूर यांचा आदेश क्र. 35/आस्था/प्रापका/चंद्रपूर -2026 दि. 27/02/2026 रोजीचा कार्यकारी अधिकारी मो.वा.नि./स.मो.वा.नि. यांच्या सिमातपासणी नाका लक्कडकोट येथील कर्तव्य व जबाबदाऱ्या माहे मार्च 2026 नियुक्तीबाबत कार्यालयीन आदेषाची प्रत 2 पाने 5) दि. 23 मार्च 2026 रोजी 9/43 मिनीटानी श्री. पवन पोटदुखे मो.वा.नि. प्रादेषिक परिवहन अधिकारी कार्यालय चंद्रपूर यांनी वाहन क्र. CH 08 AT 7482 कलम 213(5)(म) मो.वा.का. 1988 अन्वये चालान नं. MH 330486260323094952 अन्वये केलेली 500/- रुपयाची पावती प्रत 1 पान 6)कॅष बुक रेकॉर्ड मधील दि. 21/03/2026 ते दि. 23/03/2026 पावेतोच्या नोंदी असलेल्या पानांच्या झेरॉक्स प्रती एकुण पाने 5 असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तरी यातील गैरअर्जदार क्रमांक 1 खाजगी एंजन्ट नामे श्री.विलास देशमुख याने तक्रारदार यास लक्कडकोट आर.टी.ओ चेक पोस्ट वरुन ट्रक पास करण्याकरीता दिंनाक 23.03.2026 रोजी 500/-रु ची लाच मागणी करुन लाच रक्कम स्विकारली तसेच गैरअर्जदार क्र 2 पवन प्रभाकर पोटदुखे पद-मोटर वाहन निरीक्षक,कार्यालय- प्रादेशिक परिवहन कार्यालय, चंद्रपूर यांनी सदर कृतीस प्रोत्साहन देउन, भ्रष्टाचार करणेकामी प्रवृत्त केल्याने त्यांचेविरुदध भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम 1988, सुधारणा 2018 कलम 7 (अ),12 अन्वये कायदेषीर कार्यवाही होणेकरीता माझी कायदेषीर फिंयाद आहे.

( अनिल जिट्टावार )
पोलीस उपअधिक्षक
लाचलुचपत प्रतिंबधक विभाग नागपूर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
HEMANT SHANKARRAO PAWAR
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Sumit Ramdas Parte
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

ठाणे अमलदार
पो. स्टे. राजुरा
जि. चंद्रपूर